कार्यालय शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर. दि० 24.8.16

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद नागपूर,
~~वर्धा, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली.~~

विषय :- १९८७-८८ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देणेबाबत.

संदर्भ :- शासन पत्र क्रमांक व्हीएलएस-१०८७/३३७०/प्राशि-३, दि० २६-८-८७.

०००

उपरोक्त संदर्भाकित पत्रान्वये शासनाने खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करुन खालील शैक्षणिक संस्थेला जून ८७ पासून इयत्ता १ ली ते १९८७-८८ या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह प्राथमिक शाळा सुरु करण्यास खालील नमूद केलेल्या अटीची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विना अनुदान तत्वावर " खास बाब " म्हणून परवानगी देण्यात येत आहे.

अ०क्र०	संस्थेचे नांव	शाळेचे नांव	ठिकाण व तालुका	माध्यम
[illegible]	[illegible]	मुलीची प्राथमिक शाळा	कामठी	उर्दू

१] संस्था सदर शाळा विना अनुदान तत्वावर चालविण्यास आर्थिकदृष्टया सक्षम असली पाहिजे.

२] संस्थेने शाळेसाठी शासनाने विहित केलेल्या नियमानुसार आणि मुंबई प्राथमिक शिक्षण नियमावली १९४९ मध्ये विहित केलेल्या अटीनुसार जागा, शैक्षणिक साहित्य आणि इतर सुविधांची सोय केली पाहिजे. तसेच शाळेसाठी विहित केलेल्या नियमानुसार, विहित वयोमर्यादित व प्रशिक्षित शिक्षक वर्ग नेमला पहिजे व त्यांना शासनाने विहित केलेल्या दराने वेतन व भत्ते दिले पाहिजेत.

३] संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशाचे [वर्गातील विद्यार्थ्यांची संख्या, विद्यार्थ्यांचे प्रवेश इत्यादी] काटेकोरपणे पालन केले पाहिजे.

४] संस्थेने जवळपासच्या शाळेवर आपल्या शाळेमुळे कोणतेही विपरीत परिणाम होणार नाहीत याची दक्षता घेतली पाहिजे.

आपणांस विनंती करण्यात येते की ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन मगच त्या संस्थेला खाजगी शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

[कृमाप०]